# शुभमन गिलचा मँचेस्टरमध्ये इतिहास

**मँचेस्टर–** टीम इंडिया इंग्लंड दौर्‍यावर आहे. या दौर्‍यात टीम इंडियाचा कॅप्टन शुभमन गिल खूप चांगली कामगिरी करत आहे. शुभमन गिल याने टेस्ट सीरिजमध्ये रन्सचा पाऊस पाडला आहे. शुभमन गिलसमोर इंग्लंडचे बॉलर्सही फेल झाले. संपूर्ण टेस्ट सीरिजमध्ये जबरसदत परऑफर्मन्स दाखवला आहे. आता चौथ्या टेस्ट मॅचमध्ये शुभमन गिल याने सेंच्युरी झळकावली आहे. शुभमन गिल याने झळकावलेली ही सेंच्युरी या सीरिजमधील चौथी सेंच्युरी आहे. यासोबतच शुभमन गिल याने अनेक रेकॉर्ड्स आपल्या नावावर केले आहेत.

**सीरिजमधील चौथी सेंच्युरी**

शुभमन गिल याने या सीरिजमध्ये चार सेंच्युरी ठोकल्या आहेत. लीड्समधील पहिल्या मॅचमध्ये त्याने सेंच्युरी झळकावली. त्यानंतर बर्मिंगहॅम टेस्ट मॅचमध्ये अनेक विक्रम मोडले. पहिल्या इनिंगमध्ये त्याने २६९ रन्स केले. त्यानंतर दुस्र्‍या इनिंगमध्ये पुन्हा १६१ रन्सची इनिंग खेळली. लॉर्ड्स टेस्टमध्ये त्याला चांगला परफॉर्मन्स करता आला नाही. पण मॅचेंस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर त्याने पुन्हा एकदा




सेंच्युरी झळकावली. शुभमन गिलने २३८ बॉल्समध्ये १२ फोर मारले.

**अशी कामगिरी करणारा पहिला कॅप्टन**

शुभमन गिल हा त्याच्या पहिल्या टेस्ट सीरिजमध्ये कॅप्टन म्हणून ४ सेंच्युरी झळकावणारा पहिला प्लेअर बनला आहे. आतापर्यंत कोणत्याही कॅप्टनला त्याच्या पदार्पणाच्या टेस्ट सीरिजमध्ये ४ सेंच्युरी झळकावता आल्या नाहीत. वॉर्विक आर्मस्ट्राँग, सर डॉन ब्रॅडमन, ग्रेग चॅपेल, विराट कोहली आणि स्टीव्ह स्मिथ यांनी त्यांच्या पहिल्या टेस्ट सीरिजमध्ये ३-३ सेंच्युरी झळकावल्या आहेत. या सीरिजमध्ये आणखी एक मॅच शिल्लक आहे. शुभमन गिलला आणखी सेंच्युरी झळकावण्यासाठी अजून दोन इनिंग आहेत.

**ब्रॅडमन आणि सुनील गावस्कर यांच्यासोबत बरोबरी**

शुभमन गिल याने ऑस्ट्रेलियाचे महान सर डॉन ब्रॅडमन आणि भारताचे सुनील गावस्कर यांच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे. आतापर्यंत टेस्ट सीरिजमध्ये कॅप्टन म्हणून सर्वाधिक सेंच्युरी करण्याचा विक्रम या दोघांच्या नावावर होता. १९४७-४८ मध्ये सर डॉन ब्रॅडमन यांनी भारता विरुद्धच्या सीरिजमध्ये ४ सेंच्युरी झळकावल्या होत्या. सुनील गावस्कर यांनी १९७८-७९ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध ४ सेंच्युरी झळकावल्या होत्या पण दोघांनीही घरच्या मैदानावर हा पराक्रम केला होता.

**टेस्ट सीरिजमध्ये ७००+ रन्स**

शुभमन गिल याने इंग्लंड विरुद्धच्या टेस्ट सीरिजमध्ये आतापर्यंत एकूण ७१५ रन्स केले आहेत. यासोबतच टेस्ट सीरिजमध्ये ७००+ रन्स करणारा तो दुसरा कॅप्टन बनला आहे. शुभणन गिलच्या आधी सुनील गावस्कर यांनी १९७८-७९ च्या वेस्ट इंडिज विरुद्धच्या टेस्ट सीरिजमध्ये ७३२ रन्स केले होते. सुनील गावस्कर आणि शुभमन गिल वगळता इतर कोणत्याही भारतीय कॅप्टनला टेस्ट सीरिजमध्ये ७००+ रन्स करता आले नाहीयेत.

# नगरमध्ये संविधान भवनासाठी १५ कोटी

## उपमुख्यमंत्री अजित पवार; डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे मार्केट यार्ड येथे अनावरण

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – नगर शहरात लवकरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावेला साजेसे असे संविधान भवन उभारले जाईल. यासाठी जिल्हा नियोजन निधीतून ५ कोटी रूपये व शासन १० कोटी रूपये निधी उपलब्ध करून देईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनी दिली.

मार्केट यार्ड चौक येथील भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, महानगरपालिका आयुक्त डॉ.यशवंत डांगे, अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य ड.गोरक्ष लोखंडे, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, माजी खासदार प्रा.जोगेंद्र कवाडे, भन्ते राहूल बोधी, आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, देशाला एकता, समता आणि बंधुतेच्या नात्याने बांधण्याची ताकद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमध्ये आहे. आज येथे उभारण्यात आलेला बाबासाहेबांचा पुतळा म्हणजे त्यांच्या कार्याचा व विचारांचा खर्‍या अर्थाने गौरव आहे. शिक्षण, समता व बंधुता ही बाबासाहेबांची त्रिसूत्री आपल्या मनात कायम जागी ठेवणारे हे स्मारक नियमितपणे प्रेरणा देणारे ठरेल. जगातील सर्वोत्कृष्ट संविधान डॉ. आंबेडकरांनी भारताला दिले. त्यांनी गरीब, वंचित व शोषित घटकांना समानतेचा हक्क बहाल केला. यावर्षी सामाजिक न्याय विभागासाठी २५ हजार कोटींची भरीव तरतूद करण्यात आली आहे. जोपर्यंत या पृथ्वीवर चंद्रसूर्य अस्तित्वात आहेत, तोपर्यंत भारताचे संविधान कधीही बदलेले जाणार नाही.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित समाजासाठी आपले जीवन समर्पित केले होते. अहिल्यानगर जिल्ह्यात १९२८ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भेट दिली होती. अहिल्यानगर येथील निवासात असतांनाच त्यांनी मथॉट्स ऑफ पाकिस्तानफ हा ग्रंथ लिहिला. लंडन गोलमेज परिषदेतून आल्यानंतर जिल्ह्याच्या वतीने त्यांचा मुंबई येथे सत्कार करण्यात आला. बाबासाहेबांचे अहिल्यानगर जिल्ह्याशी जिव्हाळ्याचे नाते होते.

याप्रसंगी प्रा.जोगेंद्र कवाडे, पुतळा समितीचे अध्यक्ष सुमेध गायकवाड, अशोक गायकवाड, अजय साळवे, नाथाभाऊ आल्हाट, सुरेश बनसोडे, महानगरपालिका जल अभियंता परिमल निकम, भन्ते राहूल बोधी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकात आयुक्त यशवंत डांगे यांनी अहिल्यानगर शहरात महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या विकासकामांचे सादरीकरण केले.

# भारत-इंग्लंड चौथा कसोटी सामना अनिर्णित

**मँचेस्टर–** भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथा कसोटी सामना अनिर्णित राहीला आहे. रविंद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी केलेल्या भन्नाट बॅटींग पुढे इंग्लंडच्या गोलंदाजांनी नांगी टाकली. पहिल्या सत्रात इंग्लंडच्या गोलंदाजांनी शुभमन गिल आणि केएल राहुल यांना बाद केले. पण पुढची सर्व सत्र भारताने आपल्या नावे केली. रविंद्र जडेजा पाठोपाठ वॉशिंग्टन सुंदर यांनेही आपलं शतक पूर्ण केलं. हा कसोटी सामना अनिर्णित राखण्यात भारताला यश आलं. त्यामुळे पाच कसोटी सामन्याची ही मालिका सध्या दोन एक अशा स्थितीत आहे. शेवटचा कसोटी सामना ओव्हलवर होणार आहे. त्यामुळे ही मालिका बरोबरीत सोडवण्याची संधी भारताला आहे. भारताने ४२५ धावा केल्या. त्या बदल्यात चार विकेट गमावल्या. जाडेजा आणि सुंदरने २०३ धावांना नाबाद भागिदारी केली.

पाचव्या दिवसाच्या खेळाला सुरुवात झाल्यानंतर शुभमन गिल आणि केएल राहुल यांनी सावध पवित्रा घेतला. केएल राहुल याला आपलं शतक पुर्ण करता आलं नाही. तो ९० धावांवर बाद झाला. त्याला बेन स्टोकने बाद केले. त्यानंतर भारताचा कॅप्टन शुभमन गिल याने चांगली खेळी करत आपलं शतक पुर्ण केलं. त्याने १०३ धावा केल्या. या मालिकेतील गिलचे हे चौथे शतक होते. तो १०३ धावांवर बाद जाला. त्यानंतर मात्र रविंद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांना इंग्लंडच्या गोलंदाजांची पिस काढली. एका ही इंग्लंडच्या गोलंदाजाला या दोघांवर वर्चस्व गाजवता आले नाही. पहिल्या सत्रात दोन विकेट गमावल्यानंतर जाडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांने इंग्लिश गोलंदाजांना घाम फोडला. रविंद्र जाडेजाने आपलं शतक पुर्ण केलं.

चौथ्या कसोटी सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पंतला पहिल्या दिवशी पायाच्या अंगठ्याला दुखापत झाली होती. त्यानंतर तो बाहेर पडला. दुसर्‍या दिवशी त्याने फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि अर्धशतक झळकावले. भारताचा पहिला डाव ३५८ धावांवर संपुष्टात आला. बेन स्टोक्सने ५ बळी घेतले. पंत व्यतिरिक्त, साई सुदर्शन (६१) आणि यशस्वी जयस्वाल (५८) यांनी अर्धशतके झळकावली.

# गोंडेगाव येथे संत सावता महाराज पुण्यतिथी साजरी



**नेवासा (तालुका प्रतिनिधी)–** तालुक्यातील गोंडेगाव येथील सुसे मळा येथे संत शिरोमणी सावता महाराज पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

यानिमित्त लक्ष्मीकांत महाराज नांगरे यांचे कीर्तन झाले. माजी जिल्हा परिषद सदस्य दत्तात्रय काळे, डॉ. शिवाजी शिंदे, सुखदेव फुलारी, सिद्धांत नवले, डॉ. संतोष फुलारी, शंकर महाराज सुसे, संजय महाराज गोंडे, शिवाजी महाराज वाघ, कृष्णा महाराज सुसे, रोहिदास सुसे, भगवान धाडगे, कुंडलिक सुसे, बाबासाहेब सुसे, उत्तम घुले, अशोक पवार यांचेसह भजनी मंडळ व भाविक उपस्थित होते.सुसे परिवाराकडून उपस्थित भाविकांना महाप्रसाद देण्यात आला.

## सहाव्या वेतन आयोग फरकासह अन्य मागण्यांसाठी शनैश्वर देवस्थानच्या

# जुन्या कामगारांचे ४ ऑगस्टपासून उपोषण

**शनिशिंगणापूर (वार्ताहर)–** श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर देवस्थान मधील जुन्या कर्मचार्‍यांना ऑगस्ट २०२४ पासून लागू केलेला सहावा वेतन आयोग चुकीच्या पद्धतीने लागू केला गेला असल्याचा आरोप कर्मचार्‍यांनी केला असून थकीत वेतन व अन्य मागण्यांसाठी ४ ऑगस्टपासून उपोषणास बसण्याचा इशारा कर्मचार्‍यांनी दिला आहे.

याबाबत कामगार आयुक्त यांचे समवेत आठ बैठका होऊनही निर्णय झाला नाही. सहाव्या वेतन आयोगा प्रमाणे नियमानुसार सर्व विभागातील कर्मचार्‍यांना देय वेतन श्रेणी व इतर भत्ते मिळावे, महागाई भत्ता देण्यात यावा, बारा वर्षे सेवा झाल्यानंतर कालबद्ध पदोन्नती मिळावी, सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती किंवा समकक्ष वेतन श्रेणी देण्यात यावी, कोरोना काळातील १८ महिन्याचे थकीत वेतन अदा करण्यात यावे, नियमानुसार दर सहा महिन्याला भत्ता वाढ करण्यात यावी, सहावा वेतन आयोगाचे पगार पत्रक अधिकृत शासनमान्य तज्ञ लेखाधिकारी यांच्या कडून पडताळणी करुन घेण्यात यावे, १ ऑगस्ट २०२४ पासूनच्या फरकासह सुधारीत वेतन सर्व कर्मचार्‍यांना मिळावे. या मागण्यांसाठी हे उपोषण आहे.

४ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता श्री शनैश्वर देवस्थान कामगार युनियन अध्यक्ष शामसुंदर रामदास शिंदे, सचिव अजित सोपान शेटे, संचालक सुखदेव एकनाथ मनाळ, सुदाम पोपट भुसारी, संदीप आप्पासाहेब दरंदले हे येथील महाद्वार छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ आमरण उपोषणाला बसणार आहेत. तसेच त्यांना पाठिंबा म्हणून उर्वरित ३५८ जुने कायम कर्मचारी हे साखळी पद्धतीने उपोषण करणार आहेत.

याबाबतचे निवेदन आमदार, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, सहाय्यक धर्मदाय आयुक्त सहाय्यक कामगार आयुक्त, तहसीलदार आदींना देण्यात आले असल्याचे कामगार संघटनेने म्हटले आहे.

पान १ वरुन

## प्रवरा, मुळा नद्या दुथडी

पाणलोटात पावसाचा जोर टिकून असल्याने डोंगरदर्‍यांमधील धबधबे जोमाने सक्रिय झाले असून ओढेनाले भरभरून वाहत धरणात विसावत आहेत. परिणामी धरणाची पातळी वाढत आहे.

११०३९ दलघफू क्षमतेच्या भंडारदरा धरणात काल सकाळपर्यंतच्या २४ तासांत ७२३ दलघफू पाणी जमा झाले. साठा ९५४१ दलघफू (८६.४३ टक्के) झाला होता. पाऊस सुरूच असल्याने नियमानुसार जुलै अखेर ८५ टक्के पाणीसाठा झाल्यावर पाण्याचा विसर्ग सोडण्यात येतो. पाऊस सुरू असल्याने भंडारदरातून सकाळी ९६४१ क्युसेसने विसर्ग सोडणे सुरू होते. सायंकाळी ९३२९ क्युसेसने सुरू होता. निळवंडेतही पाण्याची आवक वेगाने होऊ लागली आहे. या धरणात काल सकाळपर्यंत ४१० दलघफू पाण्याची आवक झाली. काल सकाळी ७३६८ दलघफू पाणीसाठा होता. या धरणातून ९४७२ क्युसेसने प्रवरा नदीत विसर्ग सोडण्यात येत आहे. त्यानंतर आवक वाढल्याने सायंकाळी १४९९८ क्युसेकने पाणी सोडण्यात येत आहे. आढळा पाणलोटातही पाऊस सुरू असल्याने या धरणातून २७७ क्युसेसने विसर्ग सोडण्यात येत आहे. अकोले तालुक्यात सर्वत्र पाऊस सुरू आहे. वाकीयेथे ७८, निळवंडे ४२, अकोले ३७, आढळात २८ मिमी पावसाची नोंद झाली.

कोतूळ वार्ताहराने कळविले की, मुळा नदी पाणलोट क्षेत्रात कोतुळ, हरिश्चंद्रगड परिसरात पावसाची संततधार असल्याने मुळा नदीतील पाणी टिकून आहे. शनिवारी सायंकाळी सहा वाजता त्यात वाढ होऊन २३,०७६ क्युसेसने पाणी मुळा धरणाकडे झेपावत होते. पावसाचा काहीसा जोर ओसरल्याने हा विसर्ग ९५४१ क्युसेकपर्यंत ओसरला.पण नंतर पाऊस वाढल्याने पुन्हासंध्याकाळी १४८०६ क्युसेस आवक सुरू होती. मुळा नदी पाणलोट क्षेत्रात अकोले तालुक्यातील हरिश्चंद्रगड परिसर व कोतूळ परिसरात पावसाची संतत धार आजही सुरूच होती पावसाबरोबर जोरदार वार्‍या सह श्रावण सरी कोसळत आहेत. काल सकाळपर्यंत धरणात नव्याने ६४४ दलघफू पाणी दाखल झाल्याने मुळा धरणात २० हजार २५२ दलघफू इतका पाणीसाठा झाला आहे. आज अखेर मुळा धरणात ११,३४६ दशलक्ष घनफूट नवीन पाणी दाखल झाले आहे कोतुळ येथे काल २४ मिमी पावसाची नोंद झाली.

## गैरप्रकारामुळेच जिल्हा नियोजन...

व नियोजन अधिकार्‍यांना दिलेल्या आहेत. लवकरच हा निधी उपलब्ध होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**मंत्री कोकाटेबाबत मुख्यमंत्री ठरवतील**

कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या संदर्भातील प्रश्नावर बोलताना ते म्हणाले हा सर्वस्वी मुख्यमंत्र्यांचा अधिकार आहे. मंत्रिमंडळात कोण असावे, कोण नसावे हा अधिकार मुख्यमंत्र्यांना भारतीय घटनेचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून दिलेला आहे. पत्रकारांना विचारून याबाबत निर्णय होणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

**मुंडेबाबत महायुती एकत्र बसून निर्णय घेईल**

धनंजय मुंडे यांचा पुन्हा मंत्रिमंडळात समावेश होणार याकडे लक्ष वेधले असता अजित पवार म्हणाले, याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री घेत असतात. मी याबाबत एवढेच बोललो आहे की त्यांच्या संदर्भात न्यायालयीन व राज्य सरकारमार्फत चौकशी जी सुरू होती, त्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे. मंत्रिमंडळात कोण असावे याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री व महायुतीच्या माध्यमातून आम्ही सगळे एकत्र बसून घेऊ.

**रोहित पवारांच्या प्रश्नांवर दादा भडकले**

आमदार रोहित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार गट) दोन गट पडले आहेत, असे विधान केले. यासंदर्भात बोलताना उपमुख्यमंत्री पवार संतप्त झाले. ते म्हणाले कोण्या उपटसुंब्याच्या प्रश्नावर उत्तर देण्यास मी बांधील नाही. आम्ही आमच्या पक्षाचे काम करतो. ते त्यांच्या पक्षाचे काम करतात. त्यामुळे कोणी हा फुकटचा सल्ला देऊ नये, असे सल्ला पवार यांनी दिला.

**दादांची क्रेझ आणि गर्दी रेटारेटी**

उपमुख्यमंत्री पवार नगरला येणार म्हणून दुपारी चारपासून नगरच्या शासकीय विश्रामगृहावर कार्यकर्त्यांची गर्दी होण्यास सुरूवात झाली. उपमुख्यमंत्री पवार सायंकाळी पावणे सातच्या सुमारास नगरला आले. यावेळी विश्रामगृहावर कार्यकर्त्यांची एकच गर्दी उसळी. यावेळी दादांसोबत सेल्फी काढणे, दादांचा सत्कार करतांना फोटो काढण्यासाठी कार्यकर्त्यांची एकच धावपळ उडाली. यावेळी विश्रामगृवर चांगलीच रेटारेटी झाली. पोलिस प्रशासनाची देखील यावेळी तारांबळ उडाली.

## पनीर भेसळवर आरोप करणारे...

अर्धा किमीवर अंतरावर सुरू असलेल्या बाळासाहेब पाचपुते या व्यक्तीने तीन जिल्ह्याला भेसळयुक्त पावडरचा पुरवठा केला, त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. त्याचे पुढे काय झाले. आमदार पाचपुते यांनी भेसळयुक्त पनीरचा मुद्दा घेतला, मग त्यांनी भेसळयुक्त दुधाचा मुद्दा का नाही घेतला. बाळासाहेब पाचपुते हा कोणाचा कार्यकर्ता आहे? तो आजपर्यंत कोणाचं काम करत होता? याचीही सखोल चौकशी होण्याची आवश्यकता आहे.

गुटख्याचा विषय आ. पाचपुते यांनी उपस्थित केला. मुद्दा योग्य आहे, परंतु श्रीगोंदा तालुक्यात जर फिरून चौकशी केली तर श्रीगोंदामध्ये आजपर्यंत गुटखा सुरू होता, त्याचे हप्ते कुणी घेतले? त्यामध्ये काही मागे पुढे झाले का? यामुळे त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला? इतकी वर्ष झाले त्यांचे वडील बबनराव पाचपुते आमदार होते, त्यांच्याकडे सत्ता होती, इतके वर्ष त्यांनी हा मुद्दा का उपस्थित केला नाही. पोलीस प्रशासन काम करीत नव्हते का? पोलीस काम करत नसतील तर त्यांनी वरिष्ठ पातळीवर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे काही निवेदन दिले का? हा विषय घेतल्यानंतर यामागे काही शिजणार आहे का? याचीही चौकशी झाली पाहिजे. आपण मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या कानावर हा विषय घालणार आहोत. त्यांच्या घरापासून अर्धा किमी अंतरावर जर दूध भेसळ चालत असेल तर दूध भेसळीच्या मुद्द्यावर विद्यमान आमदार गप्प आहेत, हेही मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या कानावर घालणार आहे, असे माजी आमदार जगताप म्हणाले.

**श्रीगोंदा तालुक्यातील सिस्पे कंपनीचे काम चांगले आहे. या कंपनीचा मुख्य सुत्रधार औताडे याच्या व्यासपिठावर कोणी जावून भाषण केले. श्रीगोंद्यातील लोकांना कोणी कंपनीत पैसे गुंतवणूक करण्याचे आवाहन केले. याबाबतच्या व्हिडीओ क्लिप माझ्याकडे असल्याचा गौप्यस्फोट माजी जगताप यांनी केला. आता लोक तुमच्यामुळे आम्ही सिस्पे कंपनीत पैसे गुंतवले, याबाबत जाब विचारल्यानंतर ते पोलिसांना तपासाचे निवेदन देत असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.**

....................

**आमदार पाचपुते हे भाजपचे आहेत, तर माजी आमदार जगताप हे अजित पवार गटाचे आहेत. जगताप यांच्या आरोपामुळे आता महायुतीच्या दोन पक्षातील वाद समोर आले आहेत. जगताप यांच्या आरोपामुळे श्रीगोंदा तालुक्यात जिल्हा परिषद निवडणुकी आधीच आरोप- प्रत्यारोपांची राळ उडण्यास सुरूवात झाली आहे.**

## एकनाथ खडसेंचा जावई पुण्यात...

श्रीपाद मोहन यादव यांच्यासह दोन महिलांचा समावेश आहे.

**छाप्याचे स्वरूप आणि जप्त केलेला मुद्देमाल:**

रविवारी पहाटे ३.१५ सुमारास ही कारवाई करण्यात आली. खराडीतील स्टेबर्ड अझुर सूट याठिकाणी पोलिसांनी छापा टाकला. यावेळी आरोपींकडून एकूण ४१,३५,४०० रुपये किमतीचे साहित्य जप्त करण्यात आले. यामध्ये २.७० ग्रॅम कोकेन सदृश पदार्थ, ७० ग्रॅम गांजा सदृश पदार्थ, १० मोबाईल, दोन चारचाकी वाहने, हुक्कापॉट सेट, दारू व बियरच्या बॉटल, हुक्का फ्लेव्हर असा अमली पदार्थ व इतर साहित्य असे एकूण ४२ लाख रुपये रोख किमतीचे साहित्य जप्त करण्यात आले. अटक करण्यात आलेल्या सर्वांची ससून रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, त्यांचे रक्ताचे नमुने घेण्यात आले. याप्रकरणी अमली पदार्थ प्रतिबंधक कायदा कायद्याच्या कलम ८(क), २२(ब)(११)अ, २१(ब), २७, कोटपा ७(२), २०(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.प्रांजल खेवलकर यांना पुण्यातील ससून हॉस्पिटलमध्ये तपासणीसाठी नेले. वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर खेवलकर यांना परत हडपसरच्या घरी आणण्यात आले. या घराची झाडाझडती घेत पोलिसांनी लॅपटॉप, हार्ड डिस्कसह विविध साहित्य जप्त केल्याचे समजते.

दरम्यान, रेव्ह पार्टीत सहभागी सात जणांना तपासणीसाठी ससून सर्वोपचार रुग्णालयात काल पहाटे आणण्यात आले. त्यांच्या तपासणी अहवालातील माहिती समोर आली आहे.ससून सर्वोपचार रुग्णालयाने दिलेल्या माहितीनुसार, पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने सकाळी ६ वाजून १५ मिनिटांनी सात जणांना वैद्यकीय तपासणीसाठी आणले. अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार त्यांच्यावर कारवाई सुरू होती. त्यात पाच पुरुष आणि दोन महिलांचा समावेश होता. त्यांनी मद्य आणि अमली पदार्थांचे सेवन केले आहे का हे तपासण्यासाठी सर्वांचे रक्त आणि लघवीचे नमुने घेण्यात आले. प्राथमिक तपासणीत दोघांनी मद्य प्राशन केल्याचे निष्पन्न झाले आहे. ससूनमधील मुख्य वैद्यकीय अधिकार्‍यांनी सर्व आरोपींचे रक्त आणि लघवीचे नमुने सीलबंद करून पोलिसांच्या हवाली केले आहेत.

**पोलिसांची कारवाई**

गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळेयांनी या कारवाईबाबत पत्रकार परिषदेत सांगितले की,पुणे शहरात अंमली पदार्थ विरोधी मोहीम राबवित असताना गोपनीय माहितीच्या आधारे मिळालेल्या माहितीनुसार, खराडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत रात्री सव्वा तीनच्या सुमारास खराडी येथील रूम नंबर १०२, स्टेबर्ड अझुर सूट हॉटेलमध्ये सुरू असलेल्या ड्रग्ज पार्टीवर पोलिसांनी छापा टाकला. यावेळी आरोपींकडून एकूण ४१,३५,४०० रुपये किमतीचे साहित्य जप्त करण्यात आले. यामध्ये २.७० ग्रॅम कोकेन सदृश पदार्थ, ७० ग्रॅम गांजा सदृश पदार्थ, १०मोबाईल, दोन चारचाकी वाहने, हुक्कापॉट सेट, दारू व बियरच्या बॉटल, हुक्का फ्लेव्हर असा अमली पदार्थ व इतर साहित्य जप्त केलं आहे. तसंच आरोपींना अटक करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

**न्यायालयातील सुनावणी आणि युक्तिवाद**

रविवारी सुट्टीच्या दिवशी न्यायालयात या प्रकरणावर सुनावणी झाली. सरकारी वकिलांनी सर्व आरोपींना पुढील तपासासाठी पोलीस कोठडीची मागणी केली. सरकारी वकिलांनी 'रेव्ह पार्टी' हा शब्द वापरला असता, न्यायाधीशांनी तो शब्द वापरू नये असे सांगितले. आरोपींनी अमली पदार्थ कुठून आणले याचा तपास करायचा असल्याने ७ दिवसांची पोलीस कोठडी मिळावी, अशी मागणी सरकारी वकिलांनी केली.

दरम्यान,प्रांजल खेवलकर यांचे वकील विजयसिंह ठोंबरेयांनी जोरदार युक्तिवाद केला. त्यांनी असा दावा केला की, ही संपूर्ण कारवाई राजकीय षडयंत्र रचून करण्यात आली आहे. तसेच, आरोपींनी कोणतेही अमली पदार्थांचे सेवन केले नव्हते आणि पोलिसांनीच अमली पदार्थ 'प्लांट' केले असावेत असा आरोप त्यांनी केला. त्यांच्याकडे घटनेचे सीसीटीव्ही फुटेज असून ते न्यायालयात सादर करतील, असेही त्यांनी सांगितले. खेवलकर यांना यापूर्वीही तीन वेळा अडकवण्याचा प्रयत्न झाला होता आणि त्यांच्याकडे कोणताही अमली पदार्थ आढळला नाही, असेही वकिलांनी नमूद केले. पोलिसांनी साध्या वेशात येऊन व्हिडिओ शूटिंग केले असावे आणि त्यांना जाणीवपूर्वक अडकवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप बचाव पक्षाच्या वकिलांनी केला. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने सातही आरोपींना ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

**खराडीतील पार्टी होती 'आफ्टर पार्टी'?**

दरम्यान,ही खराडीतील पार्टी खरंतर 'आफ्टर पार्टी' होती, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. या पार्टीपूर्वी त्याच रात्री पुण्यात वेगवेगळ्या ठिकाणी दोन पार्ट्या झाल्या होत्या:

पहिली पार्टी कल्याणीनगरमधील एका पबमध्ये रात्री १.३० वाजेपर्यंत सुरू होती.कल्याणीनगरचा पब बंद झाल्यानंतर काही जण मुंडवा भागातील पंचतारांकित हॉटेलमध्ये गेले. तिथे पहाटे ३ वाजेपर्यंत तिथे दुसरी पार्टी सुरू होती, कारण पंचतारांकित हॉटेलमध्ये त्या वेळेपर्यंत परवानगी असते. त्यानंतर तिसरी पार्टी स्टेबर्ड अझुर येथे सुरु होती.

**षड्यंत्र असल्यास समोर आले पाहिजे-खडसे**

गिरीश महाजन जावयाच्या संदर्भात विचारणा केली असता एकनाथ खडसे म्हणाले की, यासंदर्भातील मला माहिती तुमच्याकडूनच पहिल्यांदा भेटत आहे आणि हे होणारच होतं हे मला माहीत आहे. त्यांना अडकवण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप एकनाथ खडसे यांनी केला. मात्र, यामध्ये राजकीय कारवाईचा वास येत आहे का? अशी विचारणा केली असता खडसे यांनी शक्यता नाकारता येत नसल्याचे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, या प्रकरणी स्थानिक पोलीस अजिबात तपास करणार नाहीत. त्यांच्यावर दबाव असू शकत. जो दोष असेल तर त्याला शिक्षा झाली पाहिजे असे सुद्धा खडसे यांनी म्हटलं आहे. मात्र मला या कारवाई संदर्भात अजूनही पूर्ण माहिती मिळालेली नाही. मला पूर्ण माहिती मिळाल्यानंतर मी स्पष्ट बोलणार्‍यांपैकी असल्याने त्यावेळी बोलेन असं त्यांनी सांगितलं. गेल्या काही दिवसांपासून विरोधात बोलत आहे त्यांना अडकवण्याची मालिका सुरू आहे. त्यामुळे मी कोणाच्याही बाजूला राहणार नाही. यामध्ये षड्यंत्र असल्यास समोर आले पाहिजे, अशी मागणी एकनाथ खडसे यांनी बोलताना केली.

## २६.३४ लाख लाडक्या बहिणींचा...

मागवली होती. यानुसार माहिती व तंत्रज्ञान विभागाने सुमारे २६.३४ लाख लाभार्थी अपात्र असताना देखील लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत असल्याची माहिती सादर केली आहे.

यात काही लाभार्थी एकापेक्षा जास्त योजनांचा लाभ घेत असल्याचे, काही कुटुंबामध्ये २ पेक्षा जास्त लाभार्थी असल्याचे, तर काही ठिकाणी पुरुषांनी अर्ज केल्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत. या माहितीच्या आधारे जून २०२५ पासून या २६.३४ लाख अर्जदारांचा लाभ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त पात्र असलेल्या सुमारे २.२५ कोटी पात्र लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना जून २०२५ महिन्याचा सन्माननिधी वितरित करण्यात आला आहे.

तात्पुरत्या स्वरूपात लाभ स्थगित केलेल्या २६.३४ लाख लाभार्थ्यांच्या माहितीची संबंधित जिल्हाधिकार्‍यांकडून शहानिशा करून त्यापैकी जे लाभार्थी पात्र ठरतील त्यांचा लाभ शासनातर्फे पुन्हा सुरू करण्यात येईल. शासनाची दिशाभूल करून चुकीच्या पद्धतीने लाभ घेणार्‍या बनावट लाभार्थ्यांवर काय कारवाई करायची याबाबत माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत चर्चा करून योग्य निर्णय शासन स्तरावर घेण्यात येईल.

**१४,२९८ पुरुषांना 'लाडकी बहीण'चा लाभ, वसुली करणार**

▶ या योजनेच्या माध्यामातून जवळपास २१ कोटी रूपये पुरूषांनी आपल्या खिशात घातले आहेत. महिलांच्या नावाने पुरूषांनी अर्ज भरल्याचेही समोर आले आहे. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी कडक पावलं उचलण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेच्या नावाने ज्यांनी पैसे हडप केले आहेत त्यांच्याकडून ते पैसे वसूल केले जातील, असं अजित पवार म्हणाले. यात जर कुणी सहकार्य केलं नाही तर त्यांच्या विरोधात कठोर कारवाई केली जाईल, असंही अजित पवारांनी स्पष्ट केलं आहे.